# आकाशवाणी नागपूर,
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)
# शनिवार दिनांक २७ डिसेंबर २०२५

## ठळक बातम्या

1. **मतदान केंद्र निहाय मतदार याद्या प्रसिद्ध करण्यासाठी सर्व महानगरपालिकांना आणखी आठवडाभराची मुदत.**
2. **नागपूर महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी गेल्या चार दिवसात ५ अर्ज दाखल.**
3. **नगराध्यक्षांविरोधात अविश्वास प्रस्ताव आणण्याबाबत राज्य शासनाद्वारा कडक तरतुदी लागू.**
4. **भाऊसाहेब पंजाबराव देशमुख पुरस्काराने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अमरावती इथं सन्मानित.**
5. **नागपूर ते गोवा शक्तिपीठ महामार्ग पूर्वीच्या रेखांकानुसारच तयार करण्याची अनेक शेतकऱ्यांची मागणी.**

## आता सविस्तर बातम्या .......

मतदार याद्या

महानगरपालिका निवडणुकीच्या प्रक्रीयेदरम्यान मतदान केंद्र निहाय मतदार याद्या प्रसिद्ध करण्यासाठी सर्व २९ महापालिकांना आणखी आठवडाभर मुदत दिली आहे. यापूर्वी दिलेल्या दिशानिर्देशानुसार आज या याद्या प्रसिद्ध होणं अपेक्षित होतं. पण आता ३ जानेवारीपर्यंत मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिद्ध करण्याची मुभा राज्य निवडणूक आयोगानं काल सर्व महापालिकांना दिली आहे. मात्र या सर्व महापालिकांना दुबार मतदारांची माहिती आज जाहीर करावी लागेल.

उमेदवारी अर्ज नागपूर

नागपूर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी २३ डिसेंबरपासून उमेदवारी अर्ज भरणे सुरू झाले. चार दिवस उलटल्यानंतर काल ५ अर्ज दाखल झाले. उमेदवारी अर्ज भरण्याची अखेरची मुदत ३० डिसेंबर आहे. आज आणि उद्या शासकीय सुटी असल्याने उमेदवारी अर्ज भरण्यासाठी केवळ दोनच दिवस शिल्लक आहेत. आतापर्यंत ५ उमेदवारांनी नामांकन पत्र दाखल केले असले तरी आतापर्यंत ५५०७ अर्जाची विक्री झाली आहे. लक्ष्मीनगर झोनमधून ३६९, धरमपेठ झोनमधून ३५०, हनुमाननगर ६९१, धंतोली ५५७, नेहरूनगर ६५४, गांधीबाग ५१२, सतरंजीपुरा ४९०, लकडगंज ४६७, आशीनगर ६२९, तर मंगळवारी झोनमधून ७८८ अर्जाची उचल झाली आहे. २९ आणि ३० डिसेंबर रोजी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी गर्दी होण्याची शक्यता आहे.

अविश्वास प्रस्ताव

नगरपालिका नगराध्यक्षांविरोधात अविश्वास प्रस्ताव आणण्याबाबत राज्य शासनानं कडक तरतुदी लागू केल्या आहेत. नगराध्यक्षांवर अविश्वास प्रस्ताव मंजूर झाल्यास त्याठिकाणी सदस्यांना संधी दिली जाणार नसून तिथं थेट फेरनिवडणुकीची तरदूत करण्यात आली आहे. जिथं एका पक्षाचा नगराध्यक्ष निवडून आला असला तरी बहुमत मात्र दुसऱ्याच पक्षाला मिळालं अशा ठिकाणी नगराध्यक्षांवर अविश्वासाची परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे, यावर आळा घालण्यासाठी नियमांत तरतुदी करण्यात आल्या आहेत. यामध्ये नगराध्यक्षांनी पदग्रहण केल्यानंतर पहिल्या एका वर्षात तसंच कार्यकाळाच्या अखेरच्या सहा महिन्यांत अविश्वास प्रस्ताव सादर करता येणार नाही, अशी तरतूद नियमांत करण्यात आली आहे. त्यामुळे वारंवार राजकीय अस्थिरता निर्माण होण्यास आळा बसणार आहे. नगराध्यक्षांविरोधात अविश्वास प्रस्ताव आणायचा असल्यास कायद्यात नमूद केलेल्या कठोर अटींची पूर्तता करणं बंधनकारक राहणार आहे.

मुख्यमंत्री पुरस्कार

भारताचे पहिले कृषिमंत्री डॉक्टर पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी दिला जाणारा भाऊसाहेब देशमुख स्मृती पुरस्कार यंदा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना अमरावती इथं प्रदान करण्यात आला. ज्येष्ठ वैज्ञानिक डॉक्टर विजय भटकर यांच्या हस्ते हा सन्मान देण्यात आला. यावेळी सत्काराला उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले की, देश विदेशासह अनेक पुरस्कार आजपर्यंत स्वीकारले. मात्र भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांच्या नावाने मिळालेल्या या पुरस्काराने माझी जबाबदारी अजून वाढली आहे. भाऊसाहेब देशमुख यांनी शेतीच्या शाश्वत विकासासह शेतकऱ्यांच्या मुलांना उच्च शिक्षणाची सोय उपलब्ध व्हावी याच्यासाठी आपलं आयुष्य झिजवल. त्यामुळे आज जे सकारात्मक चित्र निर्माण झाल आहे त्याच श्रेय भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांना जात असं मुख्यमंत्री म्हणाले. दरम्यान, कार्यक्रमानंतर वार्ताहरांशी बोलतांना जागावाटप आणि युतीबाबत त्यांनी भाष्य केलं....

***आमचे अध्यक्ष रविंद्र चव्हाण असतील, बावनकुळे साहेब असतील, आशिष शेलारजी, अमित साटमजी आणि प्रत्येक त्याच्या महानगरपालिका क्षेत्रातले आमचे जे प्रमुख लोक आहेत ते चर्चा करतात. काल रात्री माहिती घेतली तर अतिशय सगळीकडे सकारात्मक चर्चा आहे. त्यामुळे युती होईल. महायुती होईल अडचण काही वाटत नाही.***

विशेष गाड्या

ख्रिसमस, नववर्ष आणि हिवाळी सुट्टी 2025 दरम्यान प्रवाशांची वाढलेली गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेने विशेष गाड्या चालविण्याचा निर्णय घेतला आहे. याअंतर्गत नागपूर-हडपसर-नागपूर तसेच पुणे-नागपूर-पुणे या विशेष एक्सप्रेस गाड्यांच्या प्रत्येकी 8 फेऱ्या धावणार आहेत. नागपूर-हडपसर विशेष गाडी सोमवार, बुधवार आणि शुक्रवार, तर हडपसर-नागपूर गाडी मंगळवार, गुरुवार आणि शनिवार रोजी धावेल. पुणे-नागपूर विशेष शनिवार, सोमवार आणि बुधवार, तर नागपूर-पुणे विशेष रविवार, मंगळवार आणि गुरुवार रोजी

चालविण्यात येणार आहे. या गाड्यांना विदर्भ, खानदेश आणि  मराठवाड्यातील प्रमुख स्थानकांवर थांबे देण्यात आले असून यांत वातानुकूलित डब्यांची सोय असणार आहे. या विशेष गाड्यांमुळे सुट्टीच्या काळात प्रवाशांना सुरक्षित, आरामदायी आणि  सुलभ रेल्वे प्रवासाचा लाभ मिळणार आहे.

शक्तिपीठ महामार्ग

राज्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेला नागपूर ते गोवा शक्तिपीठ महामार्ग पूर्वीच्या रेखांकानुसारच तयार करावा, अशी मागणी पंढरपूर, सांगोला, मोहोळ तालुक्यातील शेतकऱ्यांनी केली आहे. शक्तिपीठ महामार्गाच्या समर्थनार्थ या भागातील शेतकऱ्यांनी एकजूट दाखवली आहे. दरम्यान, सरकारने जो महामार्ग बदलण्याचा निर्णय घेतला तो योग्यच आहे, सरकारच्या या नव्या निर्णयामुळे दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना याचा फायदा होणार असल्याचं, भाजपचे किसान मोर्चाचे सरचिटणीस माऊली हळणवर यांनी म्हटलं आहे. हिवाळी अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शक्तिपीठ महामार्गात सोलापूरपासून बदल करण्याचं जाहीर केलं होतं. त्यानंतर आता मोहोळ, पंढरपूर, सांगोला, आटपाडी भागातील शेतकऱ्यांनी शक्तिपीठ महामार्गाला विरोध नसून जमिनी द्यायला तयार असल्याचं म्हटलं आहे.

वर्षाअखेर विशेष

विकसित भारताच्या उद्देशानं केंद्रसरकारनं विविध उपक्रम राबवले आहेत ऐकूया कररचनेत यंदा झालेल्या बदलांबद्दल..

***विकसित भारताचं स्वप्न डोळ्यांसमोर ठेवत 2025 हे वर्ष कररचनेच्या दृष्टीने एक महत्त्वाचा टप्पा ठरलं आहे. भारतातील करप्रणालीचा इतिहास पाहिला तर, मीठावरील अन्यायकारक कराविरोधात महात्मा गांधींनी केलेल्या ऐतिहासिक मीठ सत्याग्रहापासून या प्रवासाची सुरुवात होते. सुमारे पन्नास वर्षांपूर्वी प्राप्तीकराचे दर मोठ्या प्रमाणात वाढवल्यामुळे करचुकवेगिरीचं प्रमाणही वाढलं होतं. मात्र***

*काळानुरूप सुधारणा होत गेल्या आणि वस्तू व सेवा कर (GST) लागू झाल्यानंतर बहुपातळी करपद्धतीला पूर्णविराम मिळाला. 2025 मध्ये 18 टक्क्यांपर्यंत असलेला करदर कमी करून तो 5 टक्क्यांपर्यंत आणण्यात आल्यामुळे सामान्य नागरिकांच्या मनात करप्रणालीबद्दल विश्वास निर्माण झाला आहे. याच विश्वासाचं प्रतिबिंब दिवाळीच्या काळात झालेल्या मोठ्या प्रमाणावरील खरेदीत आणि त्यातून मिळालेल्या वाढीव महसुलात स्पष्टपणे दिसून आलं.दैनंदिन वापराच्या वस्तूंवर आणि विमा सेवांवर शून्य टक्के कर लागू केल्यामुळे मध्यमवर्ग आणि सामान्य कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे. या सुधारणांमुळे केवळ अर्थव्यवस्थेला चालना मिळाली नाही, तर कर भरण्याची संस्कृती अधिक पारदर्शक आणि सहभागात्मक होत असल्याचं चित्रही समोर आलं आहे.*

जी राम जी' विरोधात आंदोलन

मनरेगा कायद्या ऐवजी 'व्हीबी जी राम जी' हा कायदा आणून केंद्र सरकारने गरीबांच्या पोटावर पाय दिला असल्याची टीका करत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी 'जी राम जी' विरोधात आंदोलन उभारण्याचा इशारा दिला. नवी दिल्ली इथं आज काँग्रेस कार्यकारिणीची बैठक झाली, त्यात 'जी राम जी' कायद्यासह इतर मुद्द्यांवर चर्चा झाली. या पार्श्वभूमीवर खरगे यांनी हे विधान केलं आहे. मनरेगाने ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलला, हा जगातला सर्वात मोठा ग्रामीण रोजगार उपक्रम होता. आदिवासी, महिला आणि भूमीहीन नागरिकांना याचा मोठा आधार होता, असं खरगे म्हणाले. त्यामुळे मनरेगा रद्द करून कोट्यवधी गरीब जनतेला निराधार केल्याचा आरोप त्यांनी केला.

मन की बात

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या सकाळी ११ वाजता मन की बात या कार्यक्रमातून जनतेसमोर आपले विचार मांडणार आहेत . हा या कार्यक्रमाचा १२९ वा भाग असून त्याचं थेट प्रसारण आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवर ,

एआयआर न्यूज या संकेतस्थळावर आणि न्यूज ऑन एअर मोबाईल ॲपवर केलं जाणार आहे. त्याचप्रमाणे एअर न्यूज, डीडी न्यूज तसेच प्रधानमंत्री कार्यालय आणि माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या युट्युब वाहिन्यांवरून हा कार्यक्रम थेट प्रक्षेपित होणार आहे. कार्यक्रमानंतर त्याचं प्रादेशिक भाषांमधून अनुवाद  प्रक्षेपित होईल.

हवामान

विदर्भात गोंदिया जिल्ह्यात आज सर्वात कमी किमान तापमान गोंदिया इथं 9.2 अंश सेल्सिअस इतकं नोंदविण्यात आलं. गोंदिया पाठोपाठ भंडारा आणि नागपूर इथं 10 अंश सेल्सिअस तर गडचिरोली इथं 10.6 अंश सेल्सिअस इतकं किमान तापमान नोंदवण्यात आलं.

माहूर गर्दी

साडेतीन शक्तिपीठांपैकी एक नांदेड जिल्ह्यातील माहूर इथं रेणुकादेवीचं दर्शन घेण्यासाठी नाताळच्या सुट्यांमुळे भाविकांची गर्दी वाढली आहे. २० हजारांपेक्षा अधिक भाविकांनी रेणुका मातेचं दर्शन घेतलं. दररोज रात्री साडे आठ वाजता मंदिर बंद होतं, मात्र गेल्या दोन दिवसांपासून रात्री साडे नऊ वाजेपर्यंत दर्शन सुरू असल्यानं आणि भाविकांची गर्दी लक्षात घेऊन मंदिर समितीनं रांगेतील शेवटच्या भाविकाला दर्शन होईपर्यंत मंदिर खुलं ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

नरखेड

नरखेड तालुक्यातील दिंदरगांव येथे घडलेल्या घटनेची महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाने गंभीर दखल घेतली आहे. सदर प्रकार हा मानवी हक्कांचे तसेच कायद्याचे उल्लंघन करणारा असून अत्यंत निंदनीय आहे. या घटनेची महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे ॲड. धर्मपाल मेश्राम, यांनी स्वतःहून दखल घेतली आहे.

जागावाटप

अकोला महानगरपालिका निवडणुकीसाठी भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्यात जागा वाटपाबाबत पहिली बैठक पार पडली. बैठकीनंतर राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी युतीचा जागा वाटपाचा फॉर्म्युला जवळपास निश्चित झाल्याची माहिती दिली. मात्र एक दोन जागांवर अजूनही तिढा असून तो पुढील बैठकीत सुटेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. काही प्रभागांमध्ये मैत्रीपूर्ण लढतीची शक्यता असून, जागावाटप न झाल्यास राष्ट्रवादी (अ.प.) स्वतंत्रपणे निवडणूक लढवेल, असही त्यांनी स्पष्ट केल.

*****